# श्रीगुरुमाईंच्या वचनांवर ध्यान

## *महाशिवरात्री*

ईशा सरदेसाई यांच्याद्वारे लिखित

### “मी शिव आहे, शिव सर्वश्रेष्ठ आहेत”

महाशिवरात्रीप्रीत्यर्थ आयोजित झालेल्या सिद्धयोग सत्संगाचे समापन होत असताना, थेट व्हिडिओ प्रसारण समाप्त होण्याच्या ठीक आधी, श्रीगुरुमाईंनी सर्वांना एक सुंदर निर्देश दिला. श्रीगुरुमाईंनी आपल्याला या शिकवणीचा अनुभव घेण्यास सांगितले, “मी शिव आहे, शिव सर्वश्रेष्ठ आहेत.”

त्यांनी असे म्हणताच माझ्या त्वरित लक्षात आले की, हा वाक्यांश माझ्यासाठी त्या वाक्यांशांपैकी आहे, ज्यांमध्ये श्रीगुरुमाईंचे आणि त्यांच्या शिकवण्याच्या पद्धतीचे वैशिष्ट्य झळकते. हा वाक्यांश एका सूत्रासमान होता, जो उद्‌बोधक व जिज्ञासा उत्पन्न करणारा, रहस्यमय, ज्ञानाने समृद्ध आणि मुळातच परिपूर्ण होता.

मला पुन्हा एकदा या गोष्टीचे स्मरण झाले की, सिद्धयोग मार्गावर आपल्यापाशी जे काही आहे, त्या सर्वासाठी आपण कृतज्ञ असायला हवे. आपल्यापाशी सदेह श्रीगुरू आहेत, ज्या सतत आपल्याला शिकवणी प्रदान करत असतात. आपल्या श्रीगुरूंच्या मुखातून बाहेर पडलेल्या एका वाक्यांशामध्येदेखील, जीवनाप्रति असलेला आपला दृष्टिकोण रूपांतरित करण्याचे सामर्थ्य असते. म्हणून, हे आपल्यावर अवलंबून आहे की, आपल्याला जे दिले गेले आहे, त्याचा आपण सन्मान करावा, श्रीगुरूंच्या शिकवणींवर चिंतनमनन करावे आणि जे ज्ञान आपल्याला प्राप्त होईल, त्याचा आपण अभ्यास करावा.

तेव्हा, महाशिवरात्रीला सत्संग झाल्यापासून मी श्रीगुरुमाईंच्या या शिकवणीविषयी विचार करते आहे. भगवान शिव सर्वश्रेष्ठ आहेत याचा अर्थ काय आहे? “मी शिव आहे, शिव सर्वश्रेष्ठ आहेत,” असे म्हणण्याचा अर्थ काय आहे? या शब्दांमध्ये निहित असलेल्या सत्याची अनुभूती करण्यासाठी, हे शब्द आपल्या चेतनेत धारण करणे इतके हितकर का आहे?

माझ्या मनात सर्वात आधी जे आले, ते म्हणजे भगवान शिवाची अनेक नावे, ज्यांपैकी काहींचा उल्लेख मी ‘श्रीगुरुमाईंच्या वचनांवर ध्यान’मध्ये आधी केला आहे. सरळ शब्दांमध्ये सांगायचे झाल्यास, भगवान शिवासाठी प्रयुक्त केल्या जाणाऱ्या सहस्रपेक्षाही अधिक विशेषणांपैकी अधिकांश नावे हाच बोध करवून देतात की, ते ‘सर्वश्रेष्ठ’ आहेत. ते ‘महेश्वर’ म्हणजे सर्वेश्वर आहेत. ते ‘परमेश्वर’ म्हणजे परम देव आहेत. ते ‘विश्वनाथ’ आहेत, ते ‘ईशान’ म्हणजे महाशासक आहेत, सर्व ज्ञानाचे अधिष्ठाता आहेत. ते ‘शिवतर’ आहेत म्हणजे जे सर्वमंगलकारक आहे त्याहीपेक्षा ते अधिक मंगलकारी आहेत.

भगवान शिवाचे भक्तगण या नावांनी त्यांचे आवाहन करतात, त्यांचे गुणगान करतात, त्यांची प्रार्थना करतात, आणि त्यांच्याकडे आशीर्वादांसाठी याचना करतात. म्हणून, काही प्रमाणात हे शब्द लोकांच्या भक्तीचीच अभिव्यक्ती आहेत—जसे की, भगवान शिव सर्वश्रेष्ठ आहेत, त्यांच्याइतके महान, त्यांच्याइतके मंगलमय दुसरे कोणीही नाही. भगवान शिव जर *तुमचे* आराध्यदैवत असतील, तर निश्चितच तुम्हालादेखील असेच वाटेल की, ते सर्वश्रेष्ठ आहेत!

परंतु, मी यावर जेव्हा चिंतनमनन करत होते, तेव्हा मला वाटले की, या विषयाकडे एका व्यापक दृष्टिकोणातून पाहणेदेखील सहाय्यक ठरेल—अर्थात, जेव्हा विषय भगवान शिवाचा असतो, तेव्हा सर्वोच्च श्रेणी दर्शवणाऱ्या ‘सर्वश्रेष्ठ’ शब्दाचा अर्थ काय असू शकतो, यावर एका अधिक तात्त्विक दृष्टिकोणातून विचार करणे उपयुक्त ठरेल. भारताच्या शास्त्रग्रंथांनुसार, भगवान शिव साक्षात परम चेतनाच आहेत. तेच परम सत्य आहेत. त्यांच्या *व्यतिरिक्त* कोणतीही वस्तू नाही, कोणतीही व्यक्ती नाही. म्हणून, स्पष्टपणे सांगायचे झाल्यास त्यांच्यापेक्षा अधिक महान, त्यांच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ काहीही असूच शकत नाही. जे काही होते, जे काही आहे आणि जे काही असेल—त्या सगळ्याचे ते शुद्ध सारतत्त्व आहेत.

याविषयी विचार करताकरता, मी इतकी थक्क झाले की, स्वतःच्या आत्यंतिक विस्मयभावाला मला आवर घालावा लागला. हे सत्य मनाला स्तब्ध करणारे आहे आणि हे ब्रह्मांडाप्रमाणेच व्यापक आहे. हेदेखील एक कारण आहे की, श्रीगुरुमाईंच्या कथनाकडे मी इतकी आकर्षित झाले आहे—“मी शिव आहे, शिव सर्वश्रेष्ठ आहेत.” एक प्रकारे, श्रीगुरुमाई हा मुद्दा अगदी सोप्या भाषेत मांडतात व अगदी व्यावहारिक दृष्टिकोणातून तो मुद्दा समजावून सांगतात. श्रीगुरुमाई ही गोष्ट सुलभ आणि समजण्यायोग्य बनवतात, अशा प्रकारे समजावून सांगतात की, आपल्याला त्याचा अभ्यास करता येणे शक्य आहे. एखादी व्यक्ती किंवा वस्तू ‘सर्वश्रेष्ठ’ आहे असे म्हणून तिचे वर्णन करणे म्हणजे बोलीभाषेत प्रेमाने हे व्यक्त करणे की, ती व्यक्ती किंवा वस्तू किती उत्कृष्ट आहे. माझा हा अनुभव आहे की, मी माझ्या

एखाद्या परिचित व्यक्तीसाठी हा शब्दप्रयोग जेव्हाजेव्हा करते, तेव्हातेव्हा त्या व्यक्तीविषयी आपुलकीच्या भावनेचा एक तरंग माझ्या अंतरी मी अनुभवते आणि अशा वेळी मी त्या व्यक्तीविषयी आत्मीयतेच्या गहन भावनेने भरून जाते. ती व्यक्ती खरोखरच *सर्वश्रेष्ठ* असते. तिचे वर्णन करण्यासाठी अन्य कोणतेही शब्द पुरेसे नसतात. ती व्यक्ती काय आहे आणि माझ्यासाठी तिचे काय महत्त्व आहे हे व्यक्त करण्यासाठी दुसरे कोणतेच शब्द पूर्ण न्याय देऊ शकत नाहीत.

श्रीगुरुमाई जेव्हा म्हणतात, "शिव सर्वश्रेष्ठ आहेत," तेव्हा मला वाटते की, त्या आपल्याला हे दर्शवत असतात की, आपण या दोन परस्पर पूरक वस्तुस्थितींना एकमेकांशी कशा प्रकारे जोडू शकतो. भगवान शिव सर्वात महान आहेत, ते सर्वोच्च आहेत, ते परम सत्य आहेत. *आपल्या दृष्टीने* तसेच आपल्यासाठी ते सर्वश्रेष्ठ आहेत आणि ते आपल्याला तितकेच परमप्रिय व आपल्या तितकेच निकट आहेत, जितका आपला अंतरात्मा आहे.

आणि ही गोष्ट सत्संगादरम्यान श्रीगुरुमाईंनी प्रदान केलेल्या कथनाच्या दुसऱ्या भागाकडे मला घेऊन येते. *"मी* शिव आहे, शिव सर्वश्रेष्ठ आहेत." हे शब्द आणि त्यांचे स्मरण करत राहण्याचा अभ्यास, या दोन्ही गोष्टींना मी जणू एका मैत्रीपूर्ण, प्रेरणादायी आव्हानासमान मानते. भगवान शिवाच्या ज्या गुणांचे आपण स्तुतिगान करतो, तेच गुण आपण स्वतःच्या अंतरीदेखील पाहिले तर? किंवा समजा, आपण किमान असे जर मानले की, त्या गुणांचा विकास करण्यास आणि ते प्रकट करण्यास आपण सक्षम आहोत, तर काय होईल? ज्या लोकांना आपण सहजपणे 'सर्वश्रेष्ठ' म्हणतो त्यांच्याविषयी आपल्याला जो जिव्हाळा आणि सन्मान वाटतो, तोच जर आपण स्वतःच्या बाबतीत अनुभवला तर?

मी हा विचार करण्यापासून स्वतःला रोखू शकत नाही की, आपण सर्वांनी मिळून, एकत्रितपणे जर असे केले, तर आपण सत्संगाच्या प्रमुख शिकवणीचे पालन करत असू. आपण *मांगल्याची वृद्धी* करत असू. जसे की, आपण श्रीगुरुमाईंकडून शिकलो आहोत की, शांतीचा आरंभ हा आपल्यापासूनच होतो, आपण स्वतःच्या अंतरी ज्या प्रकारचे वातावरण पोषित करतो, त्या वातावरणापासून शांतीचा आरंभ होतो. आपल्यामध्ये जे सर्वश्रेष्ठ आहे, त्यावर जर आपण विश्वास ठेवला, तर आपल्या आजूबाजूला असलेल्या लोकांमध्ये जे सर्वश्रेष्ठ आहे, त्यावर विश्वास ठेवणे तितकेच सोपे होते—अर्थात, आपण जर स्वतःच्या विशिष्ट स्वभावामध्ये, आपल्या भावनांच्या चढउतारांमध्ये, आपल्या वैयक्तिक इतिहासामध्ये, विचार व कार्य करण्याच्या आपल्या विशिष्ट पद्धतींमध्ये व त्याचबरोबर या सगळ्या गोष्टींनी वेढलेले असताना आपण जर हे सत्य पाहू शकलो की, आपण कोण आहोत, तर आपल्या आजूबाजूच्या लोकांमध्ये जे

सर्वश्रेष्ठ आहे त्यावर आपण तितक्याच सहजतेने विश्वास ठेवू शकू. अंतरी वास करणाऱ्या भगवंताला आपल्या बाह्य जगातदेखील व्याप्त असलेले पाहणे हे तितकेच अधिक शक्य होते.

जसे की, आपण 'ॐ पूर्णमदः' या मंत्रांमध्ये गातो :

ॐ. ते पूर्ण आहे. हे पूर्ण आहे.
पूर्णातून पूर्णचा उदय होतो.
पूर्णातून पूर्ण घेतल्यानंतरही
पूर्णच शेष राहते.

॥ ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

आता, ज्याअर्थी आपण भगवान शिवाचे आवाहन त्यांच्या सर्वात अलौकिक रूपात केले आहे, त्याअर्थी मी तुम्हाला विचारू इच्छिते : तुमच्या दैनंदिन जीवनात मांगल्याची वृद्धी करण्यासाठी तुम्ही जागरूकतेने कोणती पावले उचलली आहेत? तुमच्या दिवसादरम्यान, खासकरून महाशिवरात्रीप्रीत्यर्थ श्रीगुरुमाईंबरोबर झालेल्या सत्संगानंतर तुम्ही, 'मी शिव आहे'चा बोध विकसित करण्याच्या अभ्यासासाठी वेळ निर्धारित केला आहे का?

तुम्ही असे जर केले असेल, तर या श्रेष्ठ प्रयत्नाने तुमच्या साधनेला कशा प्रकारे रूपांतरित केले आहे? तुमच्या जीवनात जे लोक आहेत, त्यांना तुमच्यात काही वेगळेपणा जाणवला आहे का?
त्यांनी तुम्हाला हे सांगितले आहे का की, तुमच्या संगतीत राहणे त्यांना किती प्रेरणादायक आणि ज्ञानवर्धक वाटते?

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.